संदर्भ : १) का.अ. ग्रा.पा.पु. विभाग, जि.प. नाशिक यांचे तांत्रिक मंजुरीचे पत्र क्र. जिपना/ग्रापापुवि/तांमा/२५६४, दि.१९/११/२०१६.
२) मा. जिल्हाधिकारी, नाशिक यांनी त्यांचे प्रशासकीय मान्यता आदेश क्र. जिनिस/कक्ष-१२/संस-२/आस्थाविका/११२००१६०००२/३२५०, दि.०५/१२/२०१६.
३) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचा शासन निर्णय क्र. झेडपी-२०१२/प्र.क्र.६८०/वित्त-०९, दि.०७ ऑक्टोंबर, २०१७.

---

# कार्यादेश

जा.क्र.जिपना/ग्रापापुवि/निविदा/३०८/२०१८
दिनांक : 02 FEB 2018

बी-1/56

प्रति,
**चेअरमन,**
महालक्ष्मी मजुर सहकारी संस्था, बारागांव पिंप्री,
ता.सिन्नर, जि.नाशिक

सदर कामाची निविदा आपल्या नावे, **मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक** यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा **१.००% कमी दराने** खालील नमुद अटि व शर्ती नुसार मजुर करण्यात येत आहे. त्यानुसार सदर कामाबाबत आपण सदरचे काम करण्याबाबत करारनामा करुन दिलेली आहे.

त्यानुसार खालील दर्शविलेले काम, मंजुर ब-१ ई-निविदेप्रमाणे सुरु करावे. उपअभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, येवला यांना सदर कामाची देखरेख करण्याबाबत अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. काम सुरु करण्याची तारिख या आदेशाच्या दिनांकापासून असुन, करारनाम्याप्रमाणे सदरचे काम पुर्ण करण्याची अंतिम मुदत दि.३१/०३/२०१८ पर्यंत आहे. सोबत ब-१ ई-निविदेची प्रत जोडुन पाठवित आहे.

सदरचे काम सुरु असतांना, कामावर हजर राहणा-या जबाबदार व्यक्तीचे नाव या कार्यालयास कळविण्यात यावे. या कामाबाबतचा सर्व पत्रव्यवहार, उपविभागामार्फतच करण्यात यावा. करारनाम्याप्रमाणे शासकीय संचालनाकडे कामागारांचा व कामाचा विमा उतरविणे अनिवार्य आहे. सदर कामाचा सदोष दायित्व कालावधी काम पुर्ण झाल्यानंतर १२ महिने राहील.

| अ. क्र. | कामाचे नांव | निविदेची किंमत रुपये | कामाचा दर | स्विकृती निविदेची किंमत | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १ | **जातेगाव, ता.नांदगाव येथे उंच पाण्याची टाकी क्षमता ७५००० लिटर बांधणे** | १४,३२,६९३/- | **१.००% कमी दराने** | १४,१८,३६६/- | दि.३१ मार्च, २०१८ पर्यंत |

**लेखाशिर्ष** : **आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम सन २०१६-१७**
**प्रशासकीय मंजुरी** : मा. जिल्हाधिकारी, नाशिक यांनी त्यांचे प्रशासकीय मान्यता आदेश क्र. जिनिस/कक्ष-१२/संस-२/आस्थाविका/११२०१६०००२/३२५०,दि.०५/१२/२०१६.

अटी व शर्ती :

१. सदर कामासाठीची जागा ग्रामपंचायतीच्या मालकीची असल्याबाबत खात्री करावी. तसेच सदरची जागा खाजगी मालकीची असल्यास, त्याबाबत ग्रामपंचायतीच्या नावे दानपत्र केल्याबाबत करारनामा केलेला असल्याची खात्री करावी.

२. विहीत मुदतीत काम पुर्ण न केल्यास, जिल्हा परिषद प्रतिदिनी जो दंड आकारेल, तो आपणास बंधनकारक राहील.
३. सदरचे काम पुर्ण झाल्यानंतर, सदरहू काम आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रमातून घेण्यात आल्याचा नामफलक कामाच्या ठिकाणी ठळकपणे दिसेल असा लावण्यात यावा.
४. सदर कामासाठी कोणत्याही प्रकारचा अतिरिक्त मोबदला (उदा. भाववाढ इत्यादी) तसेच कोणताही अग्रीम **(Advance)** जिल्हा परिषदेमार्फत अदा केला जाणार नाही.
५. सदर कामासाठी जसजसा निधी उपलब्ध होईल, त्याप्रमाणे देयके अदा केली जातील.
६. सदर कामाचे लेखापरिक्षण झाल्यावर, लेखापरिक्षणास काही शक अगर वसुली निघाल्यास, त्याची पुर्तता करण्याची जबाबदारी आपली राहील.
७. संदर्भ क्र.१ व २ मधील प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यतेच्या आदेशात नमुद अटी व शर्ती बंधनकारक राहतील.
८. जी.एस.टी बाबत शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित होणारे शासन निर्णय, शासन परिपत्रके, शासन अध्यादेश, शासन पत्रे लागु राहतील.
९. सदरचे काम पुर्ण झाल्यानंतर, ग्रामपंचायतीस हस्तांतरीत करणे बंधनकारक राहील.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नाशिक

**प्रत :** उप विमा संचालक, विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण भवन २६४ पहिला मजला कला नगर समोर वांद्रे, पुर्व मुंबई ४०००५१ यांना माहितीसाठी रवाना.
**प्रत :** गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नांदगाव यांना माहीतीस्तव रवाना.
**प्रत :** उप अभियंता, ग्रा.पा.पु. उप विभाग, येवला यांना माहीतीस्तव रवाना.
**सोबत :** ब-१ निविदेची प्रत जोडुन पुढील कार्यवाहीसाठी रवाना.